# कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३० /२०२५ दि. २२/०२/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कापूरबावडी** वाहतूक उपविभागचे हद्दीत श्री नंदीबाबा मित्र मंडळ तर्फे दि. २६/०२/२०२५ ते दि. ०१/०३/२०२५ रोजीपावेतो **'महाशिवरात्री'** निमित्त उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** ठाणे घोडबंदर वाहीनीवरुन कापुरबावडी सर्कलकडुन नळपाडा मार्गे कोलशेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नळपाडा सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कापूरबावडी सर्कल पासुन सरळ पुढे जावुन तत्वज्ञान विद्यापीठ मार्गे मानपाडा ब्रिज वरुन पुढे सरळ ब्रम्हांड मार्गे अथवा मानपाडा ब्रिज खालुन यु टर्न घेवुन पुढे आर मॉल येथुन डावे बाजुस वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोरून कोलशेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदरचे मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने पुढे जावुन कापुरबावडी सर्कल पासनु उजवीकडे वळण घेवुन तत्वज्ञान विद्यापीठ मार्गे ब्रम्हांड अथवा आर मॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब)** सदरचे मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने बाळकुम नाका येथुन सरळ जावुन दोस्ती कौटी गेट मधुन अथवा पुढे जावुन पाईप लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कोलशेत कडुन नंदिबाबा मार्गे कापुरबावडी सर्कल तसेच माजीवाडा मानपाडा प्रभाग समितीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ढोकाळी सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने ही उजवीकडे वळण घेवुन मनोरमानगर मार्गे अथवा लोढा अमाराकडुन लोढा बिझनेस डिस्ट्रीक समोरुन ब्रम्हांड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) घोडबंदर ठाणे वाहिनी सेवा रस्त्यावरुन विहंग इन हॉटेल जवळुन जोधपुर स्वीट येथुन डावीकडे वळण घेवुन नंदिबाबा मार्गे कोलशेतकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **जोधपुर स्वीट डी मार्ट समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने ही जोधपुर स्वीट समोरुन उजवीकडे वळण घेवुन नळपाडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २६/०२/२०२५ ते दि. ०१/०३/२०२५ रोजी १७:०० ते रात्रौ २२:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner